वि.दि. दावा क्र.**५७/२०२३**
अनिस वि. हनुमंत व इतर
नि.क्र. ५४

**वादीतर्फे साक्षीदार क्र. ०३ यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे शपथेवर विधीज्ञ श्री. पी. एन. काळदाते यांच्यामार्फत–**

६. मी शेतीचा व्यवसाय करतो. माझे लामजना येथे गट क्र. ६४ मध्ये शेत आहे. वादीचे बेंबळी, ता. धाराशिव हे मुळ गाव आहे. वादी हे पुण्याला राहतात. वादी यांची बेंबळी येथे शेतजमिन आहे. त्याचा गट क्रमांक मला माहित नाही. त्याचे क्षेत्र मला माहिती नाही. मी त्यांच्या जमिनीचा ७/१२ उतारा पाहिलेला नाही. मी वादीच्या मुळ गावच्या जमिनीमध्ये गेलो नाही. वादी यांच्याकडून मी लामजना येथील एक प्लॉट विकत घेतला होता. त्यामुळे वादी व माझी ओळख झाली. मी लामजना येथील गट क्र. ६४ मधील प्लॉट घेतला. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे.

७. वादी व प्रतिवादीमध्ये दि.२४/०७/२०१९ रोजी व्यवहार झाला. त्यापुर्वी वादी व प्रतिवादीमध्ये काही दिवसापुर्वी बोलणी झाली होती. बोलणी झाली त्यावेळेपासून मी समक्ष हजर होतो. सदर बोलणीची बैठक शेतामध्ये झाली होती. शेतामध्ये मी, वादी, प्रतिवादी क्र. १ व २, मजुर फतरू बिरादार आणि लाडलेसाब हे हजर होते. बैठकीमध्ये बोलाचाली काय झाली हे मला सांगता येणार नाही. त्यानंतर दि.२४/०७/२०१९ रोजी स्टॅम्प पेपरवर लातूर येथील तहसील ऑफिसमध्ये मजकुर टंकलिखीत करण्यात आला. त्यातील मजकुर मी वाचला. सदर स्टॅम्पमध्ये ३२,५१,०००/– रूपयामध्ये व्यवहार ठरला होता. त्यादिवशी इसारपोटी रक्कम रूपये २,००,०००/– दिले होते. राहिलेली रक्कम

मोजणी करून व नकाशा करून खरेदी खताच्या वेळेस बोजा उतरवुन देण्याचे ठरले होते. जमिनीवर कुठला व किती बोजा होता याची माहिती मला नाही.

८. स्टॅम्प वादी यांनी खरेदी केले होते. वादी यांनी कोठुन स्टॅम्प खरेदी केले होते याची माहिती मला नाही. त्यानंतर दि.२७/०८/२०१९ रोजी ५,००,०००/– रूपये वादीने प्रतिवादी क्र. १ ला दिले. त्याची लिखापढी झाली होती. त्यावर माझी सही नाही. त्यानंतर दि.०३/१०/२०१९ रोजी वादीने प्रतिवादी क्र. १ यास रक्कम रूपये १०,००,०००/– दिले त्याची रशिद पावती करण्यात आली. सदर रशिद पावतीवर वादी, प्रतिवादी, मजहरभाई व मी सहया केल्या. सदर रशिद पावती दि.०३/१०/२०१९ रोजी तयार करण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासाच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष तिन वेळा लिखापढी झाली हे मी खोटे सांगत आहे. स्टॅम्प किती रूपयाचा होता हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्याही व्यवहाराच्यावेळी मी हजर नव्हतो व प्रतिवादी क्र. १ यांनी माझे समक्ष कोणत्याही दस्तावर सहया केल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2025.09.10 16:04:38 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–१०.०९.२०२५

दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.